(भगवान बुद्धांच्या अग्रश्राविका)

# पटाचारा आणि भद्दा कापिलानी

(मराठी)



विपश्यना विशोधन विन्यास

(भगवान बुद्धांच्या अग्रश्राविका)

# पटाचारा

## आणि

# भद्दा कापिलानी

(मराठी)


**विपश्यना विशोधन विन्यास**

**धम्मागिरी, इगतपुरी**

# **M39** - **पटाचारा आणि भद्दा कापिलानी**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : जानेवारी २०२१

**मूल्य: ₹ ४०.००**

ISBN 978-81-7414-432-4

**प्रकाशक:**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मागिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा: नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४९९८, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०,
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**

**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
जी-२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

## भगवान बुद्धांची उद्घोषणा

**“एतदग्गं, भिक्खवे, मम साविकानं भिक्खुनीनं**
**विनयधरानं यदिदं पटाचारा।**
**पुब्बेनिवासं अनुस्सरन्तीनं यदिदं भद्दा**
**कापिलानी॥”**

*– अङ्गुत्तरनिकाय (१.१.२३८, २४४)*

भिक्षुंनो, माझ्या भिक्षुणी-श्राविकांमध्ये - या अग्र आहेत.
विनय धारण करणाऱ्यांमध्ये - अग्र पटाचारा.
पुनर्जन्माचे अनुस्मरण करणाऱ्यांमध्ये - अग्र भद्दा कापिलानी.

# पटाचारा आणि भद्दा कापिलानी

# पटाचारा आणि भद्दा कापिलानी

## विषयानुक्रमणिका

**प्रकाशकीय ........................................................7**
**पटाचारा ........................................................11**
वर्तमान कथा ........................................................ 11
पटाचाराचे वाईट दिवस........................................... 12
अशरणाला मिळाली शरण ....................................... 15
धन्य विपश्यना! ...................................................... 18
चन्दाची मुक्ती......................................................... 19
आम्ही त्रैविद्य झालो ................................................ 20
पंचसता (पाचशे) पटाचारा....................................... 21
उत्तमाला उपदेश ..................................................... 23
विनय धारण करणाऱ्यांमध्ये अग्र................................ 23
अतीत कथा............................................................ 23
भगवान गौतम बुद्धांचा शासनकाळ ............................ 24
**भद्दा कापिलानी ..............................................25**
जन्म...................................................................... 25
भद्दा कापिलानी आणि पिप्पली माणवचा विवाह .............. 25
घरातून बेघर झाली .................................................. 26
अद्भुत त्याग .......................................................... 27
तित्थियाराममध्ये पाच वर्षे........................................ 28
पूर्व जन्मांचे अनुस्मरण ............................................ 30
भद्दाचे भव-संसरण................................................... 30
भगवान विपस्सींचा शासनकाळ ................................. 30
द्वेषाचा दुष्परिणाम .................................................. 31

भगवान कस्सपांचा शासनकाळ .................................. 32
प्रव्रज्या - ग्रहण ...................................................... 33
भगवान गौतम बुद्धांचा शासनकाळ .............................. 35
**विपश्यना साधना केंद्र.......................................36**

# प्रकाशकीय

भगवान बुद्धांच्या वाणीने अभिसिंचित झालेले त्रिपिटक भगवानांचे महाश्रावक, महाश्राविका, उपासक, उपासिकांच्या प्रेरणादायी प्रसंगांनी काठोकाठ भरलेले आहे. भगवानांनी यांपैकी काही पात्रांना त्यांच्या विशेष गुणामुळे अग्र ही उपाधी प्रदान केली. तसेच त्यांच्या अनेक गुणांना आचरणात आणण्यासाठी परिषदेत लोकांना प्रेरित केले. प्रस्तुत पुस्तिका भिक्षुणी पटाचारा आणि भद्दा कापिलानीच्या जीवन प्रसंगावर आधारित आहे. भगवानांनी आपल्या भिक्षुणी श्राविकांमध्ये भिक्षुणी पटाचाराला विनय धारण करणाऱ्यांमध्ये अग्र आणि भिक्षुणी कापिलानीला पूर्वजन्माचे अनुस्मरण करणाऱ्यांमध्ये अग्र ही उपाधी प्रदान केली.

------------------

पटाचारा श्रावस्ती नगरातील महाधनी श्रेष्ठीची मुलगी होती. तरुण मुलीची सेवा करण्यासाठी एक तरुण नोकर ठेवला होता. त्याच्या कुसंगतीमुळे ती भटकली. तिचा विवाह दुसरीकडे कोठे होऊ नये या भीतीने ते दोघे घरातून पळून गेले आणि नगरापासून दूर एका लहानशा गावात जाऊन राहिले.

बरोबर आणलेले धन जास्त दिवस उपयोगात येऊ शकले नाही. विपन्न अवस्थेमध्ये दिवस जाऊ लागले. दोन मुले झाली; पण दोघेही मरण पावली. पतीला काळ्या नागाने दंश केला. ती दुःखी, अभागिनी महिला रडत, आक्रोश करीत एकटी श्रावस्तीकडे चालू लागली. रस्त्यात तिला माहीत झाले की काल रात्री तुफान वादळामुळे आणि पावसामुळे वडिलांचा सात मजली वाडा जमीनदोस्त झाला. त्यामध्ये तिचे वडील, आई आणि भाऊ तिन्ही गाडले गेले व मरण पावले. आता संसारात तिचा कोणीही राहिला नाही. ती पूर्ण वेडी झाली. श्रावस्तीच्या रस्त्या-रस्त्यावर नग्न भटकू लागली.

आपल्या पूर्व पुण्यकर्मामुळे भगवानांच्या संपर्कात आली. त्यांनी तिला धर्मोपदेश दिला. आतल्या-आत विपश्यना सुरु झाली. पूर्व पारमितामुळे

ती स्रोतापन्न झाली. भगवानांनी तिला प्रव्रजित केले.

एके दिवशी तांब्याभर पाण्याने तिने पाय धुतले. वाहत असलेले पाणी थोडे लांब गेल्यावर जिरून गेले. पायावर आणखी एक तांब्याभर पाणी ओतले. पाण्याचा प्रवाह आणखी थोडा लांब जाऊन जिरला. तिसऱ्या वेळीही पाणी टाकले. तेव्हाही तो पाण्याचा प्रवाह आणखी थोडा पुढे जाऊन जिरला.

या छोट्याशा घटनेमुळे आतील ज्ञानतंतूंना छेडले गेले. जशी जलधारा तशीच जीवनधारा. या संसारात कोणाची जीवनधारा वृद्धावस्थेत, कोणाची मध्यम वयात आणि कोणाची अल्पवयात सुकून जाते. पण मृत्यू सर्वांनाच आहे. या मरणानुस्मृतीच्या आधाराने विपश्यना करण्यास बसली. तेव्हा लवकरच ती स्रोतापन्नपासून सकदागामी, अनागामी आणि अरहंत अवस्थेपर्यंत जाऊन पोहोचली. मनुष्य जीवन सफल झाले, सार्थक झाले. ती पूर्णपणे दुःखमुक्त झाली.

भिक्षुणींच्या विनय-नियमांना चांगल्या प्रकारे जाणणे आणि त्यांचे पालन करणाऱ्या भिक्षुणींमध्ये पटाचारा अग्रगण्य मानली गेली. तिने तिचे सर्व उर्वरित आयुष्य आपल्यासारख्या दुःखी महिलांना धर्माच्या मार्गावर आरूढ करुन दुःखमुक्त करण्यात घालविले. या भिक्षुणींनी पटाचाराविषयी आपले भाव अशा प्रकारे प्रकट केले.

• "अहो, देवीचा उपदेश अगदी अचूक होता. मी आज आस्रवरहित आणि तिन्ही विद्या जाणणारी आहे." (चंदा)

• "आम्ही तुमचे अनुशासन पूर्ण केले आहे. आता आम्ही सर्व आस्रवरहित आणि तिन्ही विद्यांचे जाणकार आहोत. जसे तीसही देवता रणविजेत्या देवेंद्रला पुढे करतात तसेच आम्हीसुद्धा तुम्हाला पुढे करुन तुमच्या नेतृत्वाखाली विचरण करीत राहू." (तीस भिक्षुणी)

• "पुत्र-शोक रूपी सूक्ष्म शल्य, जे माझ्या शोकापन्न हृदयात छेद पाडीत होते ते निघून गेले. आज मी शल्यरहीत, तृप्त आणि परिनिवृत्त आहे." (पाचशे भिक्षुणींचे वेगवेगळे प्रकटीकरण).

--------------

लावण्यवती भद्दा कापिलानीने मद्द राष्ट्रातील सागल नगरात एका अत्यंत संपन्न परिवारामध्ये जन्म घेतला. विवाहाविषयी अनुच्छूक असतानाही तिचा विवाह पिप्पली माणवशी (आयुष्मान महाकस्सप) झाला. एके दिवशी दोघांच्या मनात प्रव्रज्येसाठी धर्मसंवेग जागृत झाला. दोघांनी एकाच वेळी करोडोंच्या संपत्तीचा त्याग करुन घर-दार सोडले. रडणाऱ्या-आक्रोश करणाऱ्या प्रजेने त्यांना गृहत्याग करण्याचा निर्णय सोडून देण्याविषयी आग्रहपूर्वक विनंती केली. त्यावर त्यांनी सांगितले, 'हे जग आम्हाला जळत असणाऱ्या पर्णकुटीप्रमाणे वाटत आहे. तुम्हीसुद्धा आपल्या भवमुक्तीचा विचार करा."

भद्दा कापिलानी एक अद्वितीय साधिका होती. तिचा त्याग अनुपम होता. तिचा इंद्रिय-निग्रह अपूर्व होता. इच्छेवर तिने विजय प्राप्त केला होता. महाप्रजापती गोतमी प्रव्रजित झाल्यानंतर भिक्षुणी संघाची रचना झाली. भद्दा धर्ममार्गावर प्रगती करीत राहिली. महाप्रजापती गोतमीने तिला प्रव्रज्या आणि उपसंपदा प्रदान केली. प्रयत्नपूर्वक विपश्यनेचा अभ्यास करीत भद्दाने अर्हत्व प्राप्त केले.

------------

भगवान बुद्धांचे भिक्षू-श्रावक आणि भिक्षुणी श्राविका यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आम्हा सगळ्यांना प्रेरणेचे कारण होवो. ज्यामुळे विपश्यी साधक आणि साधिका त्यापासून प्रेरणा घेतील व आपल्या जीवनशैलीचे पुनरावलोकन करुन शक्य होईल तेवढी सुधारणा करु शकतील. या मंगल भावनेसह या पुस्तिकेचे प्रकाशन केले जात आहे.

विपश्यना विशोधन विन्यास